श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित
भ. क. ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे

# श्रीक्षेत्र डेरवण वार्तापत्र

| वर्ष-७, अंक-७ अ | जुलै-२०१९ विशेषांक | विनामूल्य खासगी वितरणासाठी | मासिक, पाने १६ |

## वालावलकर रुग्णालयात 'बजाज फिन्सर्व्ह एम.आर.आय. केंद्रा'चे डॉ. दिलीप म्हैसेकर यांच्या शुभहस्ते उद्घाटन

वालावलकर रुग्णालयाला 'बजाज फिन्सर्व्ह' या संस्थेकडून देणगी मिळालेल्या अत्याधुनिक 'एमआरआय' केंद्राचे उद्घाटन 'महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक'चे उप-कुलगुरू मा. प्रा. डॉ. दिलीप म्हैसेकर यांच्या शुभहस्ते शुक्रवार, दि. १९ जुलै २०१९ रोजी रुग्णालयाच्या रेडिऑलॉजी विभागात करण्यात आले. या प्रसंगी 'बजाज फिन्सर्व्ह'चे मा. श्री. अजय साठे, ग्रूप हेड - कस्टमर एक्सपिरिअन्स ॲन्ड सीएसआर आणि मा. श्री. पार्थसारथी मुखर्जी, सचिव, जानकीदेवी बजाज ग्राम विकास संस्था, पुणे हे उपस्थित होते.

सन्माननीय पाहुण्यांचे डेरवण येथे सकाळी आगमन झाल्यावर श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्टचे मुख्य विश्वस्त श्री. अशोकराव जोशी आणि कार्यकारी विश्वस्त श्री. विकासराव वालावलकर यांनी त्यांचे स्वागत केले. भ.क.ल.वालावलकर वैद्यकीय महाविद्यालयात संस्थेच्या कॉन्फरन्स हॉलमध्ये वैद्यकीय संचालिका डॉ. सुवर्णा पाटील यांनी 'पॉवर पॉइंट प्रेझेंटेशन'द्वारे संस्थेची पार्श्वभूमी विशद करून सध्या सुरू असलेल्या विविध उपक्रमाद्वारे संस्था सर्वसामान्य लोकांसाठी करीत असलेल्या कामाची माहिती दिली. डॉ. म्हैसेकर, श्री. मुखर्जी आणि श्री. साठे यांनी यानंतर संस्थेच्या विस्तीर्ण




'एमआरआय सेंटर'चे उद्घाटन करताना डॉ. म्हैसेकर, श्री. मुखर्जी, श्री. विकासराव वालावलकर, श्री. अशोकराव जोशी, डॉ. विजय डोंबले; डावीकडे श्री. अजय साठे




डॉ. म्हैसेकर यांच्या हस्ते दीपप्रज्वलन

परिसरात फिरून, वैद्यकीय महाविद्यालय, क्रीडासंकुल, रुग्णालय, शाळा आदी ठिकाणी भेट देऊन आस्थेवाईकपणे पाहाणी केली.

'एमआरआय' केंद्राचे उद्‌घाटन डॉ. म्हैसेकर यांच्या शुभहस्ते झाल्यावर संस्थेच्या बहुउद्देशीय सभागृहात औपचारिक समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. समारंभाची सुरुवात शाळेतील मुलांनी गाइलेल्या सुस्वर प्रार्थनेने झाली. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते दीपप्रज्वलनानंतर डॉ. म्हैसेकर, श्री. मुखर्जी आणि श्री. साठे यांचा श्री. विकासराव वालावलकर यांच्या हस्ते शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

सभेच्या सुरुवातीला डॉ. सुवर्णा पाटील यांनी पाहुण्यांचे स्वागत करून 'बजाज फिन्सर्व्ह' ने दिलेल्या भरघोस मदतीबद्दल आणि दाखविलेल्या विश्वासाबद्दल त्यांचे विशेष आभार मानले. त्या म्हणाल्या,''जगाचिये सुखोद्देशे । रहाटणे घडे आपैसे।।'' हे जीवनाचे परमतत्त्व मानून श्रीसहजानंदसरस्वती महाराजांनी विश्वाच्या प्रपंचाची चिंता वाहिली. त्यांच्याप्रमाणेच गरिबांचे जगणे सुंदर होण्यासाठी निस्वार्थीपणे झटणारे त्यांचे शिष्यवर श्रीकाकामहाराज आणि नि:स्वार्थीपणे कष्ट करून त्यांच्यामागे आर्थिक पाठबळ उभे करणारे भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत वालावलकर या दोघांमुळेच कोकणात हे कार्य एवढ्या मोठ्या प्रमाणात उभे राहिले आहे आणि गोरगरिबांना




श्री. मुखर्जी यांच्या हस्ते दीपप्रज्वलन

परवडेल अशी वैद्यकीय सेवा उपलब्ध झाली. लाखो लोकांचे प्राण या चोवीस वर्षात वाचले.

''महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठा'शी संलग्न वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय सुरू झाल्यामुळे विद्यापीठाच्या निकषांप्रमाणे अनेक अनुभवी तज्ज्ञ डॉक्टर्स येथे आले तसेच उत्तम आधुनिक उपकरणांची सोय झाली. त्यामुळे रुग्णालयाचा दर्जा अधिकच सुधारला. आत्तापर्यंत गेली २२ वर्षे वालावलकर कुटुंबीयांनी अविरत कष्ट करून या रुग्णालयाला संपूर्ण आर्थिक पाठबळ दिले. गेल्या वर्षी 'बजाज फिन्सर्व्ह'ने 'कार्डिॲक केअर युनिट' दिले. त्याचप्रमाणे या वर्षी भरघोस आर्थिक मदत देऊन हे 'एमआरआय' युनिट सुरू करण्याला मदत केली. त्याबद्दल आम्ही त्यांचे ऋणी आहोत.

''येथे स्थापन केलेले 'एमआरआय' युनिट 'फिलिप्स १.५ टेस्ला' हे नविनतम मॉडेल आहे. हे कोकणातील पहिले खऱ्या अर्थाने 'डिजिटल एमआरआय' युनिट आहे. याच्या विशेष सॉफ्टवेअरमुळे




श्री. अजय साठे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन




*प्रमुख पाहुणे डॉ. म्हैसेकर यांचा सत्कार*

'एमआरआय' काढताना होणारा आवाज ८० टक्क्यांनी कमी झालेला आहे. शिवाय 'एमआरआय' काढताना पेशंट तंत्रज्ञाला पाहू शकेल, त्याच्याशी बोलू शकेल. तो संगीत ऐकू शकेल, त्यामुळे त्याला वाटणारी भीती कमी होईल. सर्व प्रकारचे 'एमआरआय' काढण्याची या मध्ये सोय आहे. सर्व शरीर, मस्क्युलोस्केलेटल, सर्व सांधे, मान, हृदय, एमआर अँजिओ अशा सर्व प्रकारच्या इमेजीस घेण्याची सोय आता येथे झाली आहे. 'पीईटी'स्कॅनप्रमाणेच कॅन्सरसाठी सर्व शरीराचे स्कॅनिंग, एमआरसीपी, प्रोस्टेट इमेजिंग, सीएसएफ स्टडी, एमआर स्पेक्ट्रोग्राफी अशा विविध प्रकारच्या ट्युमर्ससाठी करण्यात येणाऱ्या परीक्षणांची येथे सोय झाली आहे. यकृत, मेंदू आदीसाठी अत्याधुनिक अशी '१ मिनिट स्पेक्ट्रोस्कोपी' आता येथे करता येईल आणि लिगामेंटला झालेली दुखापतही शोधता येईल. येथे या सर्व सुविधा आम्ही बाहेरील केंद्रांच्या तुलनेत १/३ शुल्कात उपलब्ध करून देत आहोत. हे सर्व 'बजाज फिन्सर्व्ह'मुळे शक्य होत आहे. त्याबद्दल त्यांचे पुन्हा एकदा आभार!''




*श्री. पार्थसारथी मुखर्जी यांचा सत्कार*

संस्थेचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त श्री. विकासराव वालावलकर यांनी आपले विचार व्यक्त करताना सांगितले की मा. कुलगुरूंना येथे निमंत्रित करून त्यांना संस्थेचे कार्य दाखवावे अशी बऱ्याच दिवसांची इच्छा होती. त्यासाठी उचित कारण हवे ते बजाज फिनसर्व्हने पुरवले म्हणून त्यांचे आभार मानले पाहिजेत! बजाज फिनसर्व्हने पुरविलेला हा 'एमआरआय' अत्यंत आधुनिक असून पुऱ्या भारतात असे तीन किंवा चारच 'एमआरआय' बसविलेले आहेत. आणि याबद्दल मी बजाज समुहाचे, त्रिपाठीसाहेबांचे, मुखर्जीसाहेबांचे आभार मानतो.




*श्री. अजय साठे यांचा सत्कार*

यापूर्वी बजाज फिनसर्व्हने केलेल्या मदतीतून साकारलेल्या कार्डिॲक सेंटरमध्ये गेल्या दोन वर्षात ९९५ अँजिओग्राफीज आणि ३५२ अँजिओप्लॅस्टी झाल्या तर गेल्या वर्षभरात ३५ हृदयशस्त्रक्रिया झाल्या याचा त्यांनी आवर्जून उल्लेख केला आणि त्याला टाळ्यांच्या गजरात पावतीही मिळाली. अल्प उत्पन्न गटातील गरजू लोकांच्या या बहुतेक शस्त्रक्रिया त्यांना सरकारी योजनेतून मिळणाऱ्या अनुदानाच्या मदतीने झाल्या. या 'एमआरआय' सेंटरचा उपयोगही असाच गोरगरिबांसाठी होईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

किशोरवयीन मुली, गर्भवती स्त्रिया आणि कुपोषित बालके यांच्या आरोग्यासाठी आणि स्त्रियांच्या सक्षमीकरणासाठी चालवण्यात येणारे उपक्रम हे आमचे खरे कार्यक्षेत्र आहे असे ते म्हणाले.

हे रुग्णालय रुग्णांवर उपचार करण्यासाठी आहेच पण लोकांमधे आरोग्यविषयक जागृती करण्यासाठी आणि त्यांना निरोगी बनविण्यासाठी संस्थेने अनेक उपक्रम हाती घेतलेले आहेत असे सांगून त्यांनी डोहाळेजेवण, सुदामा, यशोदा, लड्डुगोपाल, माहेर, दंतचिकित्सा अशा उपक्रमांची थोडक्यात माहिती दिली. या सर्व उपक्रमांची संकल्पना ही श्रीकाकामहाराजांची असून संस्था स्वखर्चाने हे उपक्रम गेली वीस वर्षे राबवते आहे. सरकारच्या महात्मा फुले योजनेमुळे बऱ्याच रुग्णांना मदत मिळते. पण या योजनेचा लाभ न




*श्री. विकासराव वालावलकर, संस्थेच्या विविध उपक्रमांविषयी माहिती देताना*

मिळू शकणाऱ्या रुग्णांना उपचाराच्या खर्चात २०,००० रुपयांपर्यंत सूट दिली जाते याचा त्यांनी आवर्जून उल्लेख केला.

संस्थेला अठरा वर्षे झाल्यावर आता संस्थेने मेडिकल कॉलेज सुरू केले आहे. त्याचाही उद्देश या भागातील 'हेल्थ इन्फ्रास्ट्रक्चर' वाढावे आणि त्याचा लाभ कोकणातील लोकांना व्हावा हाच आहे.

क्रीडासंकुलाविषयी थोडक्यात माहिती देऊन स्थानिक मुलांनी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धात मिळविलेल्या यशाचा गौरवपूर्ण उल्लेख त्यांनी केला.

ग्रामीण भागात अशा संस्था चालविताना येणाऱ्या अडचणींविषयी बोलताना त्यांनी अपुरे इन्फ्रास्ट्रक्चर, लोकांची मानसिकता, वारंवार वीज पुरवठा खंडित होणे, इंटरनेटसेवा वारंवार खंडित होणे अशा अडचणींचा उल्लेख केला आणि आहे त्या परिस्थितीशी सामना करत आम्ही आमच्या उद्देशांशी प्रामाणिक राहून कार्य करीत आहोत आणि ही संस्था श्रीसहजानंदसरस्वती महाराजांसारख्या अवतारी विभूतीने स्थापन केलेली असल्यामुळे संस्थेचे कार्य निरंतर वाढतच जाणार असल्याचा दृढविश्वास त्यांनी अखेरीला व्यक्त केला.

श्री. मुखर्जी यांनी भाषणारंभीच रत्नागिरी जिल्ह्यातील गोरगरिबांसाठी कार्य करणाऱ्या 'श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट'चे अभिनंदन केले. ते म्हणाले,''बजाज फिनसर्व्हने या आधी दोन वेळा 'कार्डिॲक सेंटर' साठी मदत केली आणि आता तिसऱ्या वेळी त्यांनी या 'एमआरआय सेंटर'साठी मदत केली आहे. आमचा उद्देश हाच असतो की आमची मदत गरिबांपर्यंत पोहोचावी. आमचे चेअरमन श्री. राहुल बजाजसाहेब आणि श्री. संजीव बजाजसाहेब हे फक्त एवढेच पाहतात की हे पैसे सत्कारणी खर्च होतात किंवा नाही. आणि मला विश्वास वाटतो की वालावलकर हॉस्पिटलला केलेली मदत सत्कारणीच लागते. आज सकाळी साडे आठ वाजल्यापासून मी कॅम्पसमध्ये फिरतोय आणि पाहतोय! आत्ता येथे 'एमबीबीएस'पर्यंत शिक्षण मिळते. लवकरच येथे 'केजी' ते 'पीजी'पर्यंत शिक्षणाची सोय होईल! हे एवढ्या ग्रामीण भागात आणि अत्यंत कमी दरात आंतरराष्ट्रीय दर्जाची सेवा देणारे रुग्णालय पाहून मला फार आनंद वाटला!

''बजाज समुहाच्या दातृत्वाला शंभर वर्षांची परंपरा आहे. या समूहाचे संस्थापक श्री. जमनालाल बजाज यांनी १९२२ साली केलेले एक विधान मला आपणाला सांगायचे आहे. 'प्रामाणिकपणे धंदा करण्याचे शहाणपण मला द्या. धंद्यात माझी भरभराट होऊ द्या आणि देशासाठी आणि देशबांधवांसाठी त्याचा वापर करण्याची बुद्धी मला द्या' असे विधान त्यांनी जवळजवळ १०० वर्षांपूर्वी केले होते. आणि त्या विचारांचा वारसा आजही आमचे चेअरमन श्री. राहुल बजाज आणि श्री. संजीव बजाज चालवीत आहेत.

''आमच्या ग्रूपतर्फे औरंगाबादला 'कमलनयन बजाज रुग्णालय' चालविले जाते आणि ते त्या भागातील एक उत्तम रुग्णालय आहे. तेथे एक नर्सिंग कॉलेजदेखिल आहे. तेही चांगल्या तऱ्हेने चालविले




*''... मी पुन्हा येथे अधिक काहीतरी शिकण्यासाठी येईन!''*
*श्री. पार्थसारथी मुखर्जी*

जाते. आमच्या रुग्णालयातही 'स्पेशॅलिटी फॅसिलिटिज' उपलब्ध असून आम्हीही गरिबांसाठी ते रुग्णालय उत्तमरीत्या चालवीत आहोत.

''परवाच्या दिवशी मी बजाज ऑटोच्या आमच्या मुख्य वैद्यकीय अधिकाऱ्यांना भेटलो आणि सहज म्हणालो की मी डेरवणला 'एमआरआय' सेंटरच्या उद्घाटन समारंभाला जात आहे तेव्हा ते तात्काळ म्हणाले की ते रुग्णालय चांगले काम करीत आहे, त्यांना मदत करा! बजाजचे उच्च व्यवस्थापन खात्री बाळगून आहे की येथे दिलेली मदत योग्य ठिकाणीच पोहोचत आहे. खरे तर आमचे वरीष्ठ श्री. त्रिपाठीसाहेब न येऊ शकल्यामुळे मला येथे येण्याची संधी मिळाली आणि मी येथे जे रोगनिवारणाचे आणि रोगप्रतिबंधासाठी चाललेले काम पाहिले ते माझे डोळे उघडणारे आहे! मी पुन्हा येथे अधिक काहीतरी शिकण्यासाठी येईन, धन्यवाद!''

या नंतर श्री. अजय साठेसाहेबांनी आपले विचार व्यक्त केले. ते म्हणाले, ''मी आज चौथ्यांदा येथे येत आहे. येथे वारंवार येण्याची संधी मला मिळते हे माझे भाग्य आहे. पु.ल. देशपांडे यांच्या लेटरहेडवर एक तुकोबांची ओळ छापलेली होती. ''जोडोनिया धन उत्तम व्यवहारे । उदास विचारे वेच करी।।'' पु.ल. स्वत: आपली लेखनाची सर्व रॉयल्टी समाजकार्यासाठी देत असत. मी जेव्हा येथे




*''..'डेरवण मॉडेल' जर देशभरात अनुसरले गेले तर देशासाठी ते लाभाचे ठरेल!''*
*श्री. अजय साठे*

येतो तेव्हा या उक्तीची मला आठवण येते कारण वालावलकर कुटुंबीय त्याचप्रमाणे व्यवहार करीत आहेत. अशी उदाहरणे दुर्मिळ आहेत. मी आमच्या कंपनीत डेरवणचा प्रस्ताव प्रथम मांडला त्या वेळी अशा तऱ्हेने कोणी वागत असेल यावर कोणाचा विश्वासच बसला नव्हता! जेथे रुग्णांजवळ देण्यासाठी पैसे नाहीत तेथे खाजगी रुग्णालय काढणे, आज समाजात डॉक्टरांविषयी थोडी नकारात्मक भावना असताना डॉ. पाटील, डॉ. नाडकर्णी अशा चांगल्या डॉक्टर्सनी एकत्र येऊन समाजासाठी काम करीत राहणे यावर कोणी विश्वास ठेवत नव्हते. म्हणून मी त्यांना सांगत असे की डेरवणला येऊन तुम्ही पहा! तुम्ही येथे पंचवीस वर्षे काम करीत आहात. त्यात आमचा थोडासा सहभाग आहे याचा आम्हाला आनंद आहे, अभिमान आहे. आपला हा सहयोग दीर्घकाळ सुरू राहील याची मला खात्री आहे. भारतातल्या प्रत्येक जिल्ह्यात एक 'श्री विठ्ठलराव जोशी ट्रस्ट', एक वालावलकर कुटुंब असावे असे मला वाटते. 'डेरवण मॉडेल' जर देशभरात अनुसरले गेले तर देशासाठी ते लाभाचे ठरेल!




*''...येथे शिकणारे विद्यार्थी येथे होणारे संस्कार जरी सोबत घेऊन गेले तरी भारत हे प्रबळ राष्ट्र झाल्याशिवाय राहणार नाही!'' प्रमुख पाहुणे मा. दिलीप म्हैसेकर*

''बजाज कुटुंबीयांचा आग्रह असतो की देणगी योग्य ठिकाणी जावी. आम्हाला अशा संस्था शोधताना प्रयास करावे लागतात, वेळ लागतो पण एकदा अशी संस्था मिळाली की आम्ही मग आनंदाने तिला दीर्घकाळ मदत करतो आणि त्या संबंधाचा आम्हाला अभिमान वाटतो. तेव्हा आपले हे संबंध असेच दीर्घकाळ राहोत ही इच्छा!''

समारंभाचे मुख्य पाहुणे मा. दिलीप म्हैसेकर यांनी 'बजाज फिन्सर्व्ह एमआरआय सेंटर'चे उद्घाटन झाले आहे असे सर्वप्रथम जाहीर करून आपले विचार व्यक्त करण्याला प्रारंभ केला.''या महाविद्यालयाला भेट देण्याची माझी फार दिवसापासून इच्छा होती पण तो योग काही आला नव्हता. आज सकाळी मी येथे आलो. सर्व परिसर, विविध विभाग आणि प्रेझेंटेशन मी पाहिले आणि




संस्थेविषयी पॉवर पॉइंट प्रेझेंटेशन सुरू असताना

निसर्ग सान्निध्यात एखादे रुग्णालय आणि एखादे महाविद्यालय उभे राहू शकते ही संकल्पना मला खऱ्या अर्थाने माहीत झाली. आज सकाळपासून या कॅम्पसमध्ये फिरताना मला परिपूर्ण पॉझिटिव्ह एनर्जी मिळाली. आपण या महाविद्यालयात शिक्षण घेणारे विद्यार्थी भाग्यवान आहात. मी येथे प्रत्येक विभागात, लायब्ररीत गेलो आणि येथे भारतीय संस्कृतीचे जतन झालेले आहे असे मला माझ्या शाळेच्या दिवसांनंतर जाणवले. मी अनेक महाविद्यालयांना भेटी दिल्या. पण आज येथे मी लो. टिळकांचे आणि स्वातंत्र्यवीर सावरकरांचे स्मारक पाहिले आणि खऱ्या अर्थाने जीवनाचे सार्थक झाले असे मला वाटले. येथे शिकणारे विद्यार्थी येथे होणारे संस्कार जरी सोबत घेऊन गेले तरी भारत हे प्रबळ राष्ट्र झाल्याशिवाय राहणार नाही! सर्व अध्यापक, प्राध्यापक आपल्या परीने येथे सेवा देत आहेत. मी क्रीडासंकुल पाहिले, लायब्ररी पाहिली, स्किललॅब पाहिली. ही लॅब मी प्रथमच पाहिली. महाराष्ट्रात ती अन्यत्र कोठेही पाहिली नाही. आम्ही आपणाकडे फॅकल्टीज पाठविण्यापेक्षा आम्हीच येथे डॉक्टर्स पाठवू जेणेकरून ते येथे ज्ञानार्जन करून सक्षम होतील! येथे अद्ययावत टेक्नॉलॉजीचा वापर आहे. निश्चितच आहे! पण माझे असे वैयक्तिक मत आहे की टेक्नॉलॉजीचा उपयोग आणि दुरुपयोग याविषयी विचार करण्याची वेळ आली आहे.

‘‘मला हे पहिले असे महाविद्यालय दिसले की जेथे कॉम्प्युटर, मोबाईल आणि फास्ट फूड यांच्या दुष्परिणामांविषयी सावधानतेचा इशारा दिलेला दिसला आहे. त्याचे आरोग्यावर होणारे दुष्परिणाम दाखविणारे प्रेझेंटेशन पाहून मला अत्यंत आनंद झाला. या विषयावर मी स्वत: प्रेझेंटेशन केले आहे. प्रोफेशनल महाविद्यालयातील विद्यार्थी मोबाईलचा अतिरिक्त वापर करतात. रात्री १० ते सकाळी सहापर्यंत ६२ टक्के मुली आणि ६७ टक्के मुले मोबाईलचा अतिरिक्त



ड्रीम हेल्थ पार्कची संकल्पना विशद करताना मेडिकल डायरेक्टर डॉ. सुवर्णा पाटील




बेसिक सर्जिकल स्किल्स लॅबमध्ये, सोबत मेडिकल डायरेक्टर डॉ. सुवर्णा पाटील, श्री. विकासराव वालावलकर आणि श्री. अशोकराव जोशी




*अटल टिंकरिंग लॅबमध्ये, सोबत शिक्षण संचालिका शरयू यशवंतराव*



*शिवसृष्टी आणि शिवसमर्थ गडाला भेट*

वापर करीत असतात. हा ब्रिटिश मेडिकल जर्नलचा आकडा आहे. या वर्षीच्या आकडेवारीत २-२ टक्यानी वाढच झाली आहे. काल मी याच विषयावर मुंबई विद्यापीठात ज्येष्ठांच्यासमोर बोललो. आज माझ्यासमोर अनेक तरुण विद्यार्थी आहेत. त्यांना माझे सांगणे आहे की मोबाईलचा वापर जपून करा. ५० टक्क्यांपेक्षा जास्त डिस्चार्ज झालेल्या मोबाईलमधून जास्त रेडिएशन होत असते. येथील विद्यार्थ्यांनी ते प्रदर्शन (ड्रिम हेल्थ पार्क) जरूर पाहावे. तेथे भारतीय संस्कृतीचे खरे दर्शन आहे.

हा सर्व परिसर पाहून मी भारावून गेलो आहे. पुढील प्रगतीसाठी आणि यशासाठी संस्थेला शुभेच्छा!''

सूत्रसंचालक श्रीमती आश्विनी खांडेकर यांनी आभार प्रदर्शित केल्यावर सभेची सांगता झाली.



*श्रीस्वामी समर्थ- श्रीराममंदिराला भेट*

# महसूलमंत्री मा. ना. चंद्रकांतदादा पाटील यांची वालावलकर वैद्यकीय महाविद्यालयाला भेट



*मा. ना. चंद्रकांत पाटील यांचे वैद्यकीय महाविद्यालयात आगमन*

महाराष्ट्र राज्याचे महसूल आणि सार्वजनिक बांधकाम मंत्री मा. ना. चंद्रकांतदादा पाटील यांनी रविवार दि. १४ जुलै २०१९ रोजी सकाळी भ.क.ल. वालावलकर रुग्णालय आणि ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालयाला भेट दिली आणि श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटिज ट्रस्ट द्वारा डेरवण परिसरामध्ये गेली पन्नास वर्षे सुरू असलेल्या विविध सामाजिक, संस्कृतिक, धार्मिक कामाची माहिती करून घेतली. ट्रस्टचे कार्यकारी विश्वस्त श्री. विकासराव वालावलकर आणि वैद्यकीय संचालिका डॉ. सुवर्णा पाटील यांनी मंत्रीमहोदयांचे स्वागत करून त्यांना ट्रस्टने केलेल्या विविधांगी कामाविषयीची माहिती सादरीकरणाद्वारे दिली. मंत्रीमहोदयांनी अनेक प्रश्न विचारून ट्रस्टच्या कल्याणकारी योजनांची तपशीलवार माहिती करून घेतली. दुर्गम भागात राहणाऱ्या गर्भवती महिलांना प्रसूतीच्या संभाव्य दिवसाआधी



*संस्थेच्या पौष्टिक आहार योजनेविषयीची पुस्तिका उत्सुकतेने वाचताना*



संस्थेच्या कार्याविषयीचे सादरीकरण पाहताना



संस्थेची विविध प्रकाशने देताना

तीन आठवडे रुग्णालयात आणून त्यांची प्रसूती सुरक्षित करणाऱ्या रुग्णालयाच्या 'माहेर' योजनेविषयी नामदारांनी विषेश समाधान व्यक्त केले. त्याचप्रमाणे ट्रस्टतर्फे चालविण्यात येणाऱ्या पाठशाळेबद्दलही औत्सुक्य दाखविले.

एकंदरीतच ट्रस्टने केलेल्या कामाविषयी आणि त्यामुळे परिसरातील समाजजीवनाच्या उंचावलेल्या स्तराविषयी त्यांनी समाधान व्यक्त केले आणि ट्रस्टच्या समाजोपयोगी कार्यासाठी सरकारचे सदैव सहकार्य राहील याची ग्वाही दिली. माननीय मंत्रीमहोदयांसोबत सौ. पाटील तसेच मा. श्री. सचिन पटवर्धन, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य लेखा समिती यांनीही ट्रस्टच्या कार्याविषयी समाधान व्यक्त करून या भेटीबद्दल आनंद व्यक्त केला.



*डावीकडून - डॉ. सुवर्णा पाटील, श्री. विकासराव वालावलकर, ना. चंद्रकांत पाटील, सौ. पाटील, डॉ. विनय नातू, ॲड. सचिन पटवर्धन, जिल्हाधिकारी श्री. सुनील चव्हाण आणि डॉ. नेताजी पाटील*

# मा. विकासराव वालावलकर यांचा 'षष्ट्यब्दीपूर्ती' समारंभ उत्साहात साजरा



श्रीगणेश पूजन

श्रीसद्गुरू बाबामहाराज सहस्रबुद्धे समाधिमंदिरात 'श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटिज ट्रस्ट'चे कार्यकारी विश्वस्त आणि मुंबईच्या 'समर्थ डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन'चे प्रमुख मा. श्री. विकासराव वालावलकर यांची षष्ट्यब्दीपूर्ती दि. १२ आणि १३ जून २०१९ रोजी अत्यंत उत्साहात पार पडली.

बुधवार, दि. १२ रोजी सद्गुरू श्रीबाबामहाराज तसेच सद्गुरू श्रीसहजानंदसरस्वती स्वामी समर्थ महाराज यांच्या मंदिरात विडे ठेऊन आणि त्यांचे आशीर्वाद घेऊन तसेच श्रीसद्गुरू काकामहाराज आणि विकासरावांच्या मातोश्री श्रीमती मालतीकाकू यांचे आशीर्वाद घेऊन कार्यक्रमाला सुरुवात झाली. पहिल्या दिवशी चारी वेदांच्या संहितेचे पारायण आणि महारुद्राभिषेक आणि तूलाविधी आयोजित करण्यात आला होता. श्रीविकासरावांची तूला साखरेने तर सौ. मुक्तावहिनींची तूला गुळाने करण्यात आली.



श्रीकाका घरचा आहेर करताना



तूला समारंभ



चि. श्रीपतीकडून पितृपूजन



६० दिव्यांनी औक्षण

दुसऱ्या दिवशी म्हणजे गुरुवार, दि. १३ जून रोजी ‘साठी-शांती’च्या धार्मिक विधींना सकाळी सात वाजता सुरुवात झाली. श्रीगणेश पूजन, पुण्याहवाचन, मातृकापूजन, नांदीश्राद्ध, मुख्य देवता (श्रीमार्कंडेय) स्थापना, ग्रहस्थापना, अग्नीस्थापना, ग्रहहोम, मुख्य देवता प्रीत्यर्थ हवन, बलीदान आणि पूर्णाहुती आदी विधी यथासांग करण्यात आले. विद्वज्जन ब्रह्मवृंदाद्वारे मंत्रजागर करण्यात आला.



वडीलधाऱ्यांचे आशीर्वाद

वारणसीहून या कार्यक्रमासाठी मुद्दाम उपस्थित राहिलेले पंडितप्रवर श्रीगणेश्वरशास्त्री द्राविड यांनी विकासरावांना शुभाशीर्वाद देताना त्यांच्या आणि संस्थेच्या धार्मिक क्षेत्रातील कार्याचा गौरवाने उल्लेख केला. या प्रसंगी बोलताना ते म्हणाले,‘‘भगवंताच्या कृपेने या पुण्यात बरेचसे वैदिक लोक आहेत. वेदांच्या रक्षणा-संवर्धनासाठी, मूळ रूपात ते राहण्यासाठी त्यांची सतत आवृत्ती होणे गरजेचे असते. त्या गोष्टीला प्रोत्साहन मिळण्यासाठी सार्वजनिक कार्यक्रमांची आवश्यकता आहे. सार्वजनिक कार्यक्रमात जेव्हा वेदपठण होते तेव्हा जर काही त्यामध्ये उणीव असेल तर तिचे पूर्णपणे परिमार्जन होते. हे स्थान एखाद्या वटवृक्षाप्रमाणे विशाल आहे. येथे सदैव अनुष्ठाने सुरू असतात. त्यामुळे वैदिकांच्या योगक्षेमाचीही सोय येथे होते. आर्थिक व्यवस्था दृढ असेल तर तेथे धर्मकार्ये व्यवस्थितपणे चालतात. येथे अशोकमहाराजांच्या प्रत्येक कार्यात वालावलकरांची मदत आहे. वालावलकरांनी वयाची साठ वर्षे पूर्ण केली आहेत. अशा वेळी शरीराला सुरक्षाकवचाची गरज असते. शांती करून वेदपारायणाने ती पुरविली जाते. वैदिकांनी त्यांना आशीर्वाद दिलेले आहेतच. वालावलकर यांना दीर्घायुष्य लाभो. त्यांचे मन, बुद्धी, शरीर कार्यक्षम राहावे, भगवंताने आणि महाराजांनी त्यांना पूर्ण आशीर्वाद द्यावा. त्यांच्या दीर्घ आणि सर्वकार्यक्षम आयुष्यासाठी श्रीकाशीविश्वेश्वराच्या चरणी मी प्रार्थना करतो.’’



मंत्रजागर आणि विद्वज्जनांचे आशीर्वाद



*डावीकडून- चि. श्रीपती, डॉ. निर्मल सरपोतदार, सौ. सुप्रिया नलावडे, मातोश्री मालुताई, श्री. विकासराव, सौ. मुक्ताताई, प्रा. डॉ. नेहा देशपांडे, डॉ. शरयू देशपांडे आणि श्री. देशपांडे*



*डावीकडून - श्री.बिल्वकुमार वालावलकर, सौ. कल्पना बिल्वकुमार, मातोश्री मालुताई, श्री. विकासराव, सौ. मुक्ताताई, चि. श्रीपती, श्री. रत्नाकर वालावलकर (काका) आणि श्री. दादा देसाई*

मंत्रजागराला पंडितप्रवर श्रीगणेश्वरशास्त्री द्राविड यांच्यासह वे.मू. वसंतराव फडकेगुरुजी, वे.मू. नवाथेगुरुजी, वे.मू. दिनकरभट्ट फडकेगुरुजी यांच्यासह पुण्यातील तसेच बाहेरील अनेक ज्येष्ठ तसेच तरुण वैदिक विद्वानांनी भाग घेतला होता त्यामुळे हा मंत्रजागर 'न भूतो' असाच झाला.

श्री. विकासराव आणि सौ. मुक्तावहिनी यांचा तांदूळ आणि डाळीने तूलाविधी करण्यात आल्यावर ब्रह्मवृंदाने पठण केलेल्या आशीर्वचनाने धार्मिक कार्यक्रमांची सांगता झाली. दोन्ही दिवस श्री. विकासरावांना भेटण्यासाठी आणि शुभेच्छा देण्यासाठी त्यांचे निकटचे नातेवाईक, गुरुबंधू, स्नेही-सोबती आणि समाजाच्या विविध स्तरातील प्रतिष्ठित परिचितांनी एकच गर्दी केली होती. समाधिमंदिरातील स्वयंसेवकांनी श्रीगणपतीची चांदीची भव्य मूर्ती भेट देऊन कोणत्याही शब्दांविना आपल्या भावना व्यक्त केल्या.



*स्वयंसेवकांकडून सप्रेम भेट*

# गुरुपौर्णिमेनिमित्त श्रीसहस्रबुद्धे समाधिमंदिरात 'मुखोद्गत क्रमपारायण'

पुण्याच्या श्रीवासुदेवानंतसरस्वती पाठशाळेचे विद्यार्थी वे.मू. मनोज जोगळेकर आणि वे.मू. समीर मिराशी यांनी गुरुपौर्णिमेनिमित्त श्रीबाबामहाराज सहस्रबुद्धे समाधिमंदिरात दि. ३ ते १५ जुलै २०१९ या काळात 'मुखोद्गत क्रमपारायण' पूर्ण केले. दि. १५ जुलै रोजी मंदिरात श्रीकाकामहाराज जोशी यांच्या हस्ते दोघांचा चांदीचे भांडे, शाल, श्रीफळ आणि संभावनाद्रव्य (रु. एकवीस सहस्र) देऊन सत्कार करण्यात आला.

पाठशाळेत पंधरा वर्षे संथा घेतलेल्या या दोघांच्या सत्कारप्रसंगी श्री काकामहाराज म्हणाले की,''पूर्वी एक वेळ अशी परिस्थिती होती की अगदी आठ-दहाच घनपाठी राहिले होते. त्या वेळी सगळे किंजवडेकर गुरुजींना म्हणायचे की आता आपण वृद्ध झालात, आपली गादी कोण चालवणार? आता फारसे घनपाठी राहिले नाहीत. त्या वेळी किंजवडेकर गुरुजी म्हणायचे, की होतील हो कोणीतरी तयार! ते त्या वेळी पाठशाळा चालवायचे. तिला सरकारकडून अनुदान मिळत असे. पण ब्राह्मण म्हणून ते अनुदान शासनाने बंद केले. श्रीमहाराज त्यांना म्हणाले की तुम्ही पाठशाळा बंद करू नका. तुम्ही आमच्याकडे या, आम्ही तुम्हाला मदत करू. त्या वेळी वे.मू. गोरे गुरुजी आणि वे.मू. दंडगेगुरुजी हे दोन विद्यार्थी त्यांच्याकडे अध्ययन करत होते. त्यांना महाराज दरमहा चारशे रुपये मदत करीत असत. त्यानंतर ही पाठशाळा सुरू झाली आणि आता त्याचे हे फळ मिळते आहे. या दोघांनी येथेच थांबू नये. त्यांच्या अभ्यासाची सोय मंदिरात गुरुकृपा बिल्डिंगमध्ये स्वतंत्र करण्यात येईल. त्यांनी घनपाठाचा अभ्यास पूर्ण करावा अशी माझी इच्छा आहे.''



*क्रमपारायण - वे.मू. मनोज जोगळेकर, वे. मू. समीर मिराशी आणि वे. मू. माधव परांजपेगुरुजी*

सत्कारप्रसंगी आपल्या भावना व्यक्त करताना वे.मू. मनोज जोगळेकर म्हणाले, ''गेल्या पंधरा वर्षातील या पाठशाळेतील प्रत्येक क्षण माझ्यासाठी महत्त्वाचा आहेच पण हा दिवस आणि हा क्षण माझ्यासाठी महद्भाग्याचा आहे. आमचे अध्ययन आम्ही केले नव्हे तर आमच्याकडून सद्गुरूंनी करवून घेतले आहे. श्रीकाकांनी दिलेल्या प्रेरणेमुळेच आणि आशीर्वादानेच ते घडले आहे. आमच्या गुरुजींनी आमच्यासाठी खूप कष्ट घेतले. हे पारायण सुरू करताना आधी प्रचंड भीती वाटत होती. पण जसे दिवस गेले तसे आम्हाला विद्वज्जनांसमोरही पारायण करताना आत्मविश्वास वाटू लागला हे आमच्यासाठी महत्त्वाचे फलित आहे. मला मिळालेला हा सन्मान मी माझ्या गुरुजींच्या चरणी अर्पण करीत आहे. आपणा सर्वांचे प्रेमाशीर्वाद पाठीशी असूदेत!''



*वे.मू. मनोज जोगळेकर यांचा सत्कार*

वे.मू. समीर मिराशी म्हणाले, ''श्रीकाकांना त्यांची स्तुती त्यांच्यासमोर केलेली अजिबात आवडत नाही. मी त्यांची स्तुती करणे म्हणजे 'ज्योतीने तेजाची आरती' करण्यासारखे आहे. तरीही मी आज बोलणार आहे. गेली पंधरा वर्षे मी मंदिरात आहे. या काळात काकांनी आम्हाला अक्षरश: घडवले आहे. अगदी जेवावे कसे येथपासून सगळे शिकवले. जे शिकवले ते एवढे उच्च दर्जाचे आहे की कोठेही गेलो तरी आम्हाला सन्मानच मिळतो. शिवाय पाठशाळेतील विद्यार्थी अभ्यासक्रम संपवून बाहेर पडतो तेव्हा तो आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी झालेला असतो. जागा वगैरे घेऊन, पाच सहा तोळे सोने घेऊन असतो. त्याचे वागणे नीटनेटके असते. सोवळ्याला इस्त्री करूनच तो नेसतो. ही एकमेव पाठशाळ आहे जेथे रहाणे, जेवणे आणि अभ्यासासाठी उत्तम प्रकारे व्यवस्था केलेली



वे.मू. परांजपेगुरुजी यांचा सत्कार




वे.मू. समीर मिराशी यांचा सत्कार

आहे. वे.मू. माधव परांजपेगुरुजींनी आमच्यासाठी खूप कष्ट घेतले. त्यांच्या घरच्या माणसांनीही; त्यांच्या घरी आम्ही पहाटे ३-३।। वाजल्यापासून पठण केले तरी कधीही त्रास मानून घेतला नाही.

श्रीकाकांचे मार्गदर्शन, गुरुजींची शिकवणी, राहण्या-जेवणाची व्यवस्था हे सगळे आम्हाला विनासायास मिळाले. वे.मू. मंदार फडके आणि वे.मू. बोरकरगुरुजींनी निरनिराळ्या विषयांची आमची आवृत्ती व्हावी या दृष्टीने योजना केली. आम्हाला घडविण्यात असे अनेकांचे प्रयत्न कारणीभूत आहेत. आई-वडिलांनीही आमच्यासाठी खूप त्याग केलेला आहे. येथे मंदिरात आम्हाला योगेशगुरुजी, नवाथेगुरुजी यांच्यासारख्यांचे मार्गदर्शन मिळाले. यज्ञाचे वेळी दोन-दोनशे ब्राह्मणांसमोर मंत्रपठण करण्याचा आत्मविश्वास आम्हाला येथेच मिळाला. अशा तऱ्हेने मोठ्या विद्वज्जनांच्या समुदायासमोर पठण करणे सोपे नसते. पहिली संथा घेताना आम्ही एवढी मजल मारू असे वाटले नव्हते पण सद्गुरूंमुळे हे शक्य झाले. देवाला प्रसन्न करायचे तर मोठी तपश्चर्या करावी लागते. सद्गुरूंच्या कृपेसाठी मात्र काहीही करावे लागत नाही. येथील सर्व मुलांचे हे भाग्य आहे की ही पाठशाळा आम्हाला लाभली. श्रीकाकांच्या नेतृत्वाखाली आमची जडणघडण झाली. येथे आमच्या सहाध्यायांचेही प्रेम, आत्मियता आम्हाला लाभली हे आमचे भाग्य आहे.''

सत्कार समारंभाला पाठशाळेचा अध्यापकवर्ग, विद्यार्थी, सत्कारमूर्तींचे आई-वडील, नातेवाईक आणि मंदिरातील भक्तगण मोठ्या संख्येने उपस्थित होते.



'...त्यांनी घनपाठाचा अभ्यास पूर्ण करावा अशी माझी इच्छा आहे.'' - श्रीकाका



क्रमपारायण श्रवण करताना

**भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत लक्ष्मण वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र**
श्रीक्षेत्र डेरवण - ४१५६०६, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी
दूरध्वनी : (०२३५५) २६४१४९ / २६४६३६ / २६४६३७ फॅक्स : (०२३५५) २६४१८१
ई-मेल : info@walawalkarhospital.com वेबसाईट : www.walawalkarhospital.com

# क्रीडासंकुलात क्रीडाशिक्षकांची वार्षिक बैठक

'एसव्हीजेसिटी' क्रीडासंकुलात क्रीडाशिक्षकांच्या वार्षिक बैठकीचे सलग चौथ्या वर्षी आयोजन करण्यात आले होते. सदर बैठकीला जिल्ह्यातील सुमारे १०० क्रीडाशिक्षक उपस्थित होते. सदर बैठकीत क्रीडाशिक्षकांना शालेय स्पर्धांच्या वेळापत्रकाचे विवरण करण्यात आले. खेळाचा अधिकाधिक प्रसार आणि खेळाडूंच्या प्रगतीसाठी क्रीडासंकुल नेहमी कार्यरत असून या वर्षी घेण्यात येणाऱ्या विभाग, तालुकास्तरीय, जिल्हास्तरीय स्पर्धांमधून उत्तमोत्तम कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना क्रीडासंकुलात प्रशिक्षण देण्याचे आवाहन क्रीडासंकुलामार्फत करण्यात आले. खो खो, कबड्डी, लंगडी हे खेळ म्हणजे कोकणचा बालेकिल्ला. यासाठी संकुलाने बंदिस्त स्टेडियम उभारले असून येणाऱ्या स्पर्धांच्या पार्श्वभूमीवर ते सराव करण्यास सदैव खुले आहे. तसेच मैदानी स्पर्धांसाठीही संकुलात आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सिंथेटिक ट्रकवर सराव करता येणार आहे.

या बैठकीत शिक्षकांच्या खेळासंबंधीत तसेच खेळाडूंसंबंधित विविध प्रश्नांचे निरसन करण्यात आले. तसेच क्रीडासंकुलात राबवण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांबद्दल माहिती देण्यात आली. आणि नवोदित खेळाडूंसाठी निवडचाचण्यांचे आयोजन करण्याचे आवाहन करण्यात आले.

# सुब्रतो मुखर्जी फुटबॉल शालेय स्पर्धा संपन्न

यावर्षीच्या शालेय जिल्हास्तरीय स्पर्धांच्या हंगामाची सुरुवात फुटबॉल स्पर्धांनी झाली. या स्पर्धा १७ वर्षाखालील मुले व मुली या वयोगटात दि. २५ व २६ जुलै २०१९ रोजी 'एसव्हीजेसिटी' क्रीडासंकुलात घेण्यात आल्या. क्रीडासंकुलात फुटबॉल खेळासाठी असलेल्या सोयी-सुविधांमुळे रत्नागिरी जिल्ह्यात फुटबॉल खेळाचा मोठ्या प्रमाणावर प्रचार व प्रसार झाला असून अनेक उत्तमोत्तम खेळाडू रत्नागिरी जिल्ह्याला मिळाले आहे. सदर स्पर्धेला रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूण, दापोली, खेड, मंडणगड, रत्नागिरी येथील विविध संघ सहभागी झाले होते.

यावेळी जिल्हा क्रीडाकार्यालयाचे प्रतिनिधी, कोकण फुटबॉल असोसिएशनचे पदाधिकारी, विविध शाळांचे क्रीडा शिक्षक, विविध संघांचे क्रीडा मार्गदर्शक व क्रीडा प्रेमी उपस्थित होते. या स्पर्धेतील यशस्वी संघ रत्नागिरी जिल्ह्याचे विभागस्तरीय स्पर्धेत प्रतिनिधित्व करेल. गेल्या दोन वर्षापासून विभागस्तरावर आपला वेगळा ठसा उमटवणाऱ्या रत्नागिरी फुटबॉल संघाचे क्रीडासंकुलामार्फत तसेच उपस्थित मान्यवरांमार्फत अभिनंदन करण्यात आले आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छाही देण्यात आल्या.

# रत्नागिरी जिल्हा मैदानी खेळ कुमारगट अजिंक्यपद स्पर्धा संपन्न

दि. २१ जुलै २०१९ रोजी 'एसव्हीजेसिटी' क्रीडासंकुलात, मुले आणि मुलींसाठी रत्नागिरी जिल्हा मैदानी खेळ कुमारगट अजिंक्यपद स्पर्धा संपन्न झाल्या. या स्पर्धेत सुमारे २८० खेळाडूंनी सहभाग नोंदविला. स्पर्धेसाठी रत्नागिरी जिल्हा ॲथलेटिक्स असोसिएशनचे अध्यक्ष संदीप तावडे उपस्थित होते. या स्पर्धेतील विजेते खेळाडू 'एसव्हीजेसिटी' क्रीडासंकुलात दि. १७ व १८ ऑगस्ट २०१९ रोजी होणाऱ्या कुमारगट राज्य अजिंक्यपद स्पर्धेसाठी रत्नागिरी जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करतील.

**मालक, मुद्रक, प्रकाशक :** श्री. विकासराव वालावलकर यांनी मुद्रा, ३८३, नारायण पेठ, पुणे-३० येथे छापून भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र, श्रीक्षेत्र डेरवण, जि. रत्नागिरी येथून प्रकाशित केले. । Visit us at https://swamisamarth.com/dervan/
**संपादिका :** डॉ. सौ. सुवर्णा पाटील-९९२१२ ५१६९५, **संपादक मंडळ :** सौ. शरयू यशवंतराव-९८८१६ १९९७४, श्री. श्रीकांत पराडकर-९५८८४ ७९२२०